# जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी यांचे कार्यालय, रत्नागिरी

दूरध्वनी क्र. :-०२३५२—२२२३०१/फॅक्स क्र. ०२३५२-२२६२५० Email ID:- collector.ratnagiri@maharashtra.gov.in


क्रमांक ससाशा/सारोनियंत्रण/04/2021 दिनांक:- 18 एप्रिल, 2021

**कोविड-19 रुग्णांसाठी वापरावयाचे "रेमडीसिवीर" प्रतिविषाणू औषधाच्या पुरवठयाबाबत स्थायी कार्यप्रणाली**

वाचले:- 1) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005.
2) भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम 1897.

**आदेश:-**

कोविड-19 या साथ रोगाचा सद्या राज्यात मोठया प्रमाणावर प्रसार वाढलेला आहे. कोविढ रुग्णांच्या HRCT चाचणीच्या अहवालानुसार "रेमडीसिवीर" हे प्रतिविषाणू इंजेक्शन रुग्णांना देणेबाबत प्रचलित आदेश आहेत. सदया राज्यामध्ये "रेमडीसिवीर" हे प्रतिविषाणू इंजेक्शनची फार कमतरता आहे. रत्नागिरी जिल्हयामधील कोविड रुग्णांचे वाढते प्रमाण व "रेमडीसिवीर" या प्रतिविषाणू इंजेक्शनची कमतरता यामुळे गरजू कोविड रुग्णांना हे इंजेक्शन उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण होत आहेत. गरजू रुग्णालाच वेळेवर या इंजेक्शनची उपलब्धता व्हावी यासाठी भारतीय साथरोग् अधिनियम 1897 व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 नुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार मी, जिल्हाधिकारी रत्नागिरी याव्दारे "रेमडीसिवीर" या प्रतिविषाणू इंजेक्शनचे उपलब्धता व व्यवस्थापनासाठी खालीलप्रमाणे प्रमाणित कार्यप्रणाली निश्चित करीत आहे.

1) जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी यांनी त्यांचेकडे उपलब्ध होणारा "रेमडीसिवीर" या प्रतिविषाणू इंजेक्शनचा वापर अत्यावश्यक रुग्णांसाठी करणेचा आहे. त्याचा गैरवापर होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

2) रेमडीसीवीर इंजेक्शन पुरवठा व व्यवस्थापणासाठी नोडल अधिकारी म्हणून डॉ. चंद्रकांत शेरखाने, RMO (Out reach) जिल्हा शासकिय रुग्णालय, रत्नागिरी **(मोबाईल क्रमांक 9960183696)** यांची नियुक्ती याद्वारे करण्यात येत आहे.

3) जिल्हयातून "रेमडीसिवीर" या प्रतिविषाणू इंजेक्शनची मागणी खाजगी व शासकिय DCH व DCHC च्या डॉक्टर्सकडूनच शासनाने विहित केलेल्या नमुन्यात रूग्णाचे प्रकृतीविषयक तपशिलासह नोडल अधिकारी डॉ.शेरखाने यांजकडे लेखी स्वरूपात येणे अनिवार्य आहे. (त्यासाठी **ई-मेल आयडी- sherkhane.cd19@gmail.com**) रूग्णाच्या नातेवाईकांमार्फत किंवा अन्य खाजगी व्यक्तीमार्फत करण्यात आलेली रेमडीसीवीर इंजेक्शनची मागणी ग्राह्य धरली जाणार नाही. याबाबत सर्व कोविड रूग्णालयांची संपर्क ठेवण्याची जबाबदारी नोडल अधिकारी डॉ. शेरखाने यांची राहील.

4) नोडल अधिकारी डॉ. चंद्रकांत शेरखाने यांनी संबंधितांची मागणी व रूग्णाचे प्रकृतीमान याबाबत स्वत: खात्री करून तातडीने तोंडी स्वरूपात (नंतर लेखी स्वरूपात सुद्धा) निवासी उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना कळवावी व त्यांची मान्यता घेतल्यानंतर या कार्यालयाकडून इंजेक्शन संबंधित रूग्णालयाला देण्यासाठी जिल्हा शासकीय रूग्णालयाचे समन्वयक यांजकडे सुपुर्द करण्यात येईल. संबंधित समन्वयक ते मागणी केलेल्या रुग्णालयाला पोहोच करतील

5) रेमडीसिवीर वापराबाबतचा दैनंदिन अहवाल नोडल अधिकारी यांनी माझ्याकडे सादर करावा.

**(लक्ष्मीनारायण मिश्रा)**
**जिल्हाधिकारी रत्नागिरी तथा,**
**अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन**
**प्राधिकरण, रत्नागिरी**

प्रत: 1) जिल्हा शल्यचिकित्सक, रत्नागिरी यांजकडे जरूर त्या कार्यवाहीसाठी
2) डॉ. चंद्रकांत शेरखाने, RMO (Out reach) जिल्हा शासकिय रुग्णालय, रत्नागिरी यांजकडे.
3) सर्व वैदयकिय अधिक्षक, शासकिय / खाजगी DCH व DCHC.

Scanned with CamSca